| फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ०२/२०२४ मधील निशाणी क्र.२२ खालील आदेश<br>(महेक शाहरूख बागवान विरुध्द शाहरूख बागवान व इतर) | MHAH150000662024 |
|---|---|

सदरचा अर्ज सामनेवाले क्र. ३ याने म्हणणे देण्यास झालेला उशीर माफ होवून म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत सामनेवाले याने शपथपत्र जोडलेले आहे.

२. सामनेवाले याने सदर अर्जात कथन केले आहे की, सामनेवाला क्र. ३ यास महत्वाचे कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे तसेच तो आजारी असल्यामुळे त्याला मुदतीत म्हणणे दाखल करता आले नाही. सामनेवाला क्र. ३ याचे म्हणणे दाखल करून न घेतल्यास त्याला न्यायहक्कापासून वंचीत राहावे लागेल. सबब, सामनेवाले क्र. ३ यास म्हणणे दाखल करण्यास झालेला उशीर माफ होवून त्याचे म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळावी.

३. अर्जदाराने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, सदरचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. म्हणणे देण्यास किती दिवसांचा उशीर का झाला याचा उल्लेख नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करावा. मंजूर केल्यास रूपये ५०००/– दंड आकारण्यात यावा.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. सामनेवाला क्र.३ हा दिनांक १७.१०.२०२४ रोजी दाव्यात हजर राहिला व त्यानंतर पुरेशी संधी देवून देखील मुदतीत म्हणणे दाखल केले नाही. त्यास सामनेवाला याने कागदपत्र न मिळाल्याने व आजारी असल्यामुळे मुदतीत म्हणणे दाखल करता आले नाही असे कारण नमुद केले आहे. परंतु, सदर कारणाच्या पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. प्रस्तुत अर्जात म्हणणे दाखल करण्यास झालेल्या उशिराबाबत सामनेवाले यांनी दिलेले कारण संयुक्तीक नाही. असे असले तरी देखील प्रस्तुत अर्ज

हा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये पोटगी मिळण्याकरिता दाखल केला आहे. त्यामुळे अर्ज पुर्णतः गुणदोषावर निकाली काढणेकरीता दोन्ही बाजुंचे म्हणणे व पुरावा अभिलेखावर असणे आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार सामनेवाले यास त्याचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे योग्य ठरेल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सामनेवाले क्र.३ याच्याविरुध्द अर्जात म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब दंडासह माफ करण्यात येतो.

२. सामनेवाले क्र.३ याने अर्जदाराला दंडापोटी रक्कम रुपये ३००/- (रक्कम रुपये तिनशे फक्त) दयावेत. तद्नंतर सामनेवाले क्र.३ यांचे म्हणणे अभिलेखावर घेण्यात येईल.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.10.04 17:36:16 +0530

(**संध्या यु. सुळ**)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नेवासा

ठिकाण– नेवासा
दिनांक – ०४/१०/२०२५